# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक २८ जून, २०२४

## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : प्रश्नोत्तरे**

**(अ)** तारांकित प्रश्न

**(ब)** अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक २३७ ते २५२ सभागृहाच्या पटलावर ठेवणे

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**गृहनिर्माण मंत्री : झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे** यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **सर्वश्री. सुनिल प्रभू, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, अस्लम शेख, धिरज विलासराव देशमुख, राजेश एकडे, संजय जगताप,डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. संजय पोतनीस, भास्कर जाधव, मोहन मते,डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. जयंत पाटील, अतुल भातखळकर, नानाभाऊ पटोले, बाळासाहेब थोरात, रवींद्र धंगेकर, मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक, प्रमोद पाटील, रोहित पवार, संग्राम थोपटे, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री. वैभव नाईक, अनिल देशमुख, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री. विकास ठाकरे, अबू आजमी वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कल्याणीनगर (जि. पुणे) परिसरात मद्यप्राशन करुन भरधाव मोटार चालविणाऱ्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलाने अनिष अवधिया व अश्विनी कोस्टा यांच्या दुचाकी वाहनाला धडक देऊन झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यु झाल्याची घटना दिनांक १९ मे,२०२४ रोजी वा त्या सुमारास घडणे, हॉटेल ट्रीलीयन सेक्युरीटी प्रायव्हेट लिमिटेड (कोझी) आणि पंचशील इन्फ्रास्ट्रक्चर मॅरीयट सुट (ब्लॅक) या दोन्ही पबमध्ये मद्यप्राशन पार्टी करुन आरटीओ नियमांचे उल्लंघन करुन नंबर प्लेट नसलेली अत्याधुनिक कार भरधाव मद्यधुंद अवस्थेत चालवून सदरची घटना घडणे, येरवडा पोलीस ठाण्यात बांधकाम व्यावसायिक विशाल अगरवाल यांच्या अल्पवयीन मुलाविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणे, सदरहू मुलास न्यायालयाच्या निर्णयानुसार वय १७ वर्षे ८ महिने असल्याने मुलाची अवघ्या १२-१५ तासात जामीनावर मुक्तता करणे, त्यानंतर पोलीसांनी कोझी व ब्लॅक हे दोन्ही पब-हॉटेल सील करुन आरोपीचे वडील विशाल अगरवाल यांच्या विरुद्ध सदोष मनुष्यवधाचा

गुन्हा दाखल करुन दोन्ही पब मालकांना अटक करणे, सदरहू अल्पवयीन मुलाच्या गुन्ह्यास मोटर वाहन कायद्यानुसार केवळ ३ वर्षाचीच शिक्षा होऊ शकते, यामुळे या कायद्यात शासनाने सुधारणा करण्याची तसेच आरोपीस शिक्षा होण्यासाठी बालन्याय मंडळाने कठोर तरतुद करण्याची आवश्यकता, सदरहू घटनेमध्ये मृतांच्या कुटुंबियांना न्याय देण्यासाठी कठोर उपाययोजना करुन आरोपी विरुद्ध कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री. विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, संजय गायकवाड, रोहित पवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. सुनिल प्रभू, अमीन पटेल, अमित विलासराव देशमुख, धिरज विलासराव देशमुख, राजेश एकडे, संजय जगताप, संजय पोतनीस, भास्कर जाधव, मोहन मते, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. जयंत पाटील, अतुल भातखळकर, नानाभाऊ पटोले, बाळासाहेब थोरात, अजय चौधरी, क्षितीज ठाकूर, हितेंद्र ठाकूर, राजेश पाटील, राम कदम, प्रमोद पाटील, योगेश सागर, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्री. चेतन तुपे, श्रीमती श्वेता महाले वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नागपूर-अमरावती महामार्गावरील धामना येथील चामुंडी एक्सप्लोसिव्ह प्रा.लि.या कंपनीत दिनांक १३ जून, २०२४ रोजी वा त्यासुमारास भीषण स्फोट होऊन या स्फोटात सहा जणांचा मृत्यू व तीन जण गंभीर जखमी होणे, स्फोटाच्या वेळी केवळ शिकाऊ कामगार व महिलाच कामावर उपस्थित असणे, या अकुशल कामगारांच्या हाती ५०० किलो स्फोटके देणे,काम सुरू असताना वरिष्ठ उपस्थित नसणे, स्फोटक असलेल्या ठिकाणी विशेष काळजी घेतली न जाणे, सुरक्षा पोशाख, सेफ्टी शूज अशी सुरक्षा साधने कामगारांना उपलब्ध करून न देता त्यांना काम करायला लावणे, या बेजबाबदारपणाला कंपनी व्यवस्थापनासोबतच शासकीय प्रशासकीय व्यवस्थासुद्धा जबाबदार असणे, स्फोट झाल्यानंतर जखमींना तात्काळ मदत मिळणे आवश्यक असताना दीड तासाने रुग्णवाहिका मदतीला पोहचल्यामुळे निष्पाप कामगारांचा जीव जाणे, गेल्यावर्षीदेखील नागपूर येथील कंपनीत स्फोट होऊन झालेल्या दुर्घटनेत निष्पाप कामगारांचा जीव गेला असणे, औद्योगिक सुरक्षेवर लक्ष ठेवणाऱ्या यंत्रणेचे याकडे दुर्लक्ष होत असणे, डोंबिवली MIDC मधून दर आठवड्याला स्फोट होऊन अपघात घडत असणे, सतत या घटना घडत असताना शासन आणि प्रशासकीय यंत्रणा याकडे गांभीर्याने लक्ष देत नसणे, याबाबत चामुंडी दुर्घटनेला जबाबदार असणाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा व मृतांच्या नातेवाईकांना व जखमींना शासनाची तसेच संबंधित कंपनी व्यवस्थापनाची ठोस मदत तात्काळ देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. राम कदम, योगेश सागर, मंगेश चव्हाण, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील खासगी शाळांनी गतवर्षीच्या तुलनेत नवीन वर्षात १० ते १५ टक्क्यांनी शुल्क वाढ केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असणे, खासगी शाळांच्या शुल्कवाढीच्या नियंत्रणाबाबत सुधारणेसाठी अद्यापही ठोस निर्णय झालेला नसून यासाठी दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी शालेय शिक्षण सहसचिव यांच्या अध्यक्षतेखाली ९ जणांची समिती गठीत केली असणे, सदर समितीने ३ महिन्यांच्या कालावधीत आपला अहवाल शासनास सादर करणे अपेक्षित असतानाही प्रत्यक्ष ३ वर्षे उलटूनही अद्यापपर्यंत समितीचा अहवाल सादर झालेला नसणे, शाळा शुल्क सुधारणा कायद्याबाबतची रचना योग्यरीतीने झाली नसून शाळा शुल्क सुधारणा कायद्याला ७ वर्षांहून अधिक काळ झाला असून अद्यापही शाळांकडून शुल्क कायद्याचा आधार घेत दर २ वर्षांनी १५% फी वाढ केली जात असणे, मुंबईतील खासगी शाळांकडून होत असणारी मनमानी शुल्कवाढ थांबविण्यासाठी शुल्कवाढीच्या नियंत्रणाबाबत सदरच्या कायद्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) सर्वश्री. अतुल भातखळकर, मोहन मते, अबू आजमी वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे अन्न व औषध प्रशासन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील मालाड परिसरात एका डॉक्टरने ऑनलाइन मागवलेल्या आईस्क्रीमच्या कोनमध्ये मानवी बोटाचा तुकडा सापडल्याची धक्कादायक बाब माहे जून २०२४ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये सदर कंपनीचे आईस्क्रीम विविध ठिकाणावरून बनवून घेतले जात असून ते इंदापूर मधील फॉर्च्यून डेअरीमार्फत बनवले असल्याचे निदर्शनास येणे, त्यानुषंगाने या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची गरज असणे, तसेच चौकशीमध्ये दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज असणे, त्यामुळे राज्यात गैरप्रकारे खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या कंपन्यांचे परवाने तात्काळ रद्द करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री. दिलीप मोहिते-पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपत्ती व्यवस्थापन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"शेलपिंपळगाव मोहितेवाडी (ता.खेड, जि.पुणे) या गावाच्या हद्दीतील चाकण शिक्रापूर रस्त्यावर मोहितेवाडी येथे दिनांक १९ मे २०२४ रोजी वा त्या सुमारास पहाटे चार वाजता गॅस वाहतूक करणाऱ्या टँकरमधून अवैधरीत्या घरगुती गॅसची चोरी करताना गॅस टँकरचा स्फोट झाला असणे, या घटनेमध्ये ६ लोक मृत्यू पावून मोठी जीवितहानी झाली असणे, सदर परिसरातील १०० ते १५० मीटर अंतरावरील घरांचे नुकसान झाले असणे, खेड तालुक्यात अवैधरीत्या घरगुती गॅस चोरीचे प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत असणे, संबधित विभागाचे याकडे पूर्णपणे होत असलेले

दुर्लक्ष, त्यामुळे खेड तालुक्यातील सर्वच गॅस एजन्सीची तपासणी करण्याची निर्माण झालेली गरज पाहता, याबाबत शासनाकडून कठोर कारवाई करण्याबाबत सर्वसामान्य जनतेची अपेक्षा असणे, शासनाकडून मात्र याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, शासनाच्या या कृतीमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण, यासाठी राज्यातील सर्वच गॅस एजन्सीची स्वतंत्र यंत्रणे मार्फत तपासणी करून नियमबाह्य गॅस एजन्सी चालकांवर कारवाई तसेच या घटनेमधील मृत व्यक्तींच्या कुटूंबियांना व अपघातग्रस्तांना शासनाकडून मदत करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, व उपाययोजना."

**चार : सर्वश्री विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, अजय चौधरी, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री आदित्य ठाकरे, सुनिल प्रभू, भास्कर जाधव, विक्रमसिंह सावंत, अनिल देशमुख, जितेश अंतापूरकर, लहु कानडे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री कैलास गोरंटयाल, रविंद्र धंगेकर, अस्लम शेख, हिरामण खोसकर, ॲड. के.सी.पाडवी, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री झिशान सिद्दीकी, कुणाल पाटील, अमीन पटेल, शिरीष चौधरी, संग्राम थोपटे, राजेश एकडे, राजन साळवी, धीरज देशमुख, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री वैभव नाईक, अमित देशमुख, रणजित कांबळे, अमित झनक, ऋतुराज पाटील, विकास ठाकरे, शिरीषकुमार नाईक, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री सुभाष धोटे, राजू आवळे, माधवराव जवळगावकर-पाटील, संजय जगताप, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, सहसराम कोरोटे, बाळासाहेब पाटील, विनोद निकोले, संदिप क्षीरसागर, राजेश टोपे, प्राजक्त तनपुरे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यातील शेतकऱ्यांबद्दल शासन उदासीन असून शासनाची ध्येयधोरणे त्यांना उध्वस्त करण्याचे काम करीत असणे, सततची नापिकी, दुष्काळ, टंचाई, अवकाळी, कर्जबाजारीपणा, कृषी विभागाच्या अपुऱ्या सोईसुविधा अशा संकटांमुळे शेतकरी मेटाकुटीस येणे, परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढणे, मात्र या गंभीर प्रश्नांकडे शासनाचे सोईस्कर दुर्लक्ष होणे, शेतमालाला हमीभाव न मिळणे, बियाणे, खते यांच्या दरात झालेली प्रचंड वाढ, यामुळे शेतकऱ्यांची होत असलेली आर्थिक कुचंबणा, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा हवेत विरणे, दुष्काळी परिस्थितीमुळे राज्यातील परिस्थिती गंभीर होणे, गतवर्षीची मदत अत्यंत तुटपुंजी असून अद्यापही बऱ्याच संख्येने शेतकरी या मदतीपासून वंचित राहणे, पीक विमा कंपन्यांच्या मुजोरीमुळे पीक विमा योजनेचा बोजवारा उडाला असून याकडे शासनाचे सोईस्कर होत असलेले दुर्लक्ष, राज्यात एकीकडे भीषण पाणी टंचाई तर दुसरीकडे टँकर माफीयांची लुटालूट याने सामान्य नागरिक हवालदिल झाला असणे, पाण्यासाठी शेतकरी टाहो फोडत असताना शासन त्याबाबत संवेदनशील नसणे, दुष्काळ व पाण्याची भीषण टंचाई निवारण्याबाबत करण्यात आलेल्या अपुऱ्या उपाययोजना, "हर घर नल का जल" योजनेद्वारे कोट्यवधी रुपये खर्चुनही महिलांच्या डोक्यावर हंडा कायम असल्याने शासनाची फसवी ठरलेली "गॅरंटी", चारा छावण्या उभारण्याबाबत शासनाकडून होत असलेली दिरंगाई, परिणामी पशुधनाचे हाल होऊन शेतकरी अडचणीत आलेला असणे, दुष्काळाच्या

पार्श्वभूमीवर शेतकरी होरपळत असताना शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीबाबत शासनाची असलेली अनास्था, माहे जानेवारी ते मे, २०२४ या कालावधीत अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई अद्याप न मिळणे, कांद्यावर निर्यात बंदी असल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी शासनाच्या चुकीच्या निर्यात धोरणांमुळे अडचणीत आलेला असणे, शेतकऱ्यांना योग्य तो लाभ मिळण्यासाठी कांदा, सोयाबीन, कपाशी, तूर, हरभरा, भुईमूग, धान, उडीद, मूग, हळद, मिरची इ. पिकांना योग्य तो दर मिळवून देण्यास शासनाला आलेले अपयश, परिणामी शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात होत असलेले आर्थिक नुकसान, धान, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांवरील अन्याय कायम असणे, कोकणातील शेतकऱ्यांकडे सरकारचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, दूध उत्पादक शेतकऱ्यांना सरकारने घोषित केलेले अनुदान न मिळणे यामुळे लाखांच्या पोशिंद्याला शासनाच्या नाकर्तेपणामुळे हात पसरण्याची वेळ आलेली असणे, तसेच गेल्या दोन वर्षात शासनाच्या विविध विभागांमध्ये उघडकीस आलेल्या भ्रष्टाचाराची व गैरव्यवहाराची शासनाकडून गांभीर्याने दखल घेतली न जाणे, स्मार्ट प्रीपेड मीटर योजना ही काही विशिष्ट उद्योगसमूहाला फायदा पोहोचविणारी असल्याने या योजनेबाबत जनतेत पसरलेला असंतोष, चंद्रपूरच्या महाऔष्णिक वीज निर्मिती केंद्रात निविदा प्रक्रिया व साहित्य खरेदीत करण्यात आलेला भ्रष्टाचार, आदिवासी विकास व शालेय शिक्षण विभागात गणवेश व इतर खरेदीमध्ये झालेला कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार, सार्वजनिक आरोग्य विभागात टक्केवारी, वसुली, बदल्या-पदोन्नतीत झालेला गैरप्रकार, ज्येष्ठता डावलून पदस्थापना, औषध तसेच रुग्णवाहिका खरेदीमध्ये झालेला हजारो कोटींचा घोटाळा, कामगार विभागात व बांधकाम कामगार मंडळामध्ये विविध योजनांमध्ये झालेला घोटाळा, राज्य उत्पादन शुल्क विभागात सुरु असलेला भ्रष्टाचार तसेच आकृतीबंध पुनर्रचनेत झालेला गैरव्यवहार, अन्न व औषध प्रशासन विभागामध्ये सुरु असलेला भ्रष्टाचार, शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेल्या महसूल विभागात बोकाळलेला भ्रष्टाचार, फसलेले वाळू धोरण व वाळू माफियांचा हैदोस त्यामुळे सर्वसामान्यांची होत असलेली परवड, सातारा जिल्ह्यातील झाडाणी, ता. महाबळेश्वर गावात उच्चपदस्थ शासकीय अधिकाऱ्यांसह तेरा जणांनी ६४० एकर जमिनीच्या खरेदीत केलेला गैरव्यवहार, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागामध्ये वाढत असलेल्या भ्रष्टाचारास शासनाचा पाठींबा असणे, सेंद्रीय शेतीसाठीचा निधी अधिकाऱ्यांच्या भोंगळ कारभारामुळे अखर्चित राहणे, या सर्व प्रश्नांबाबत शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(दुपारी २.०० वाजता)**

**पाच : उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री : सन २०२४-२०२५ चा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करतील.**

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २७ जून, २०२४

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा